पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १८

**सभावृत्तांत**

दिनांक - **२१/०७/२०१६** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक **२१/०७/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सौ.स्वाती प्रमोद साने - सभापती**
२. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
३. मा.जाधव साधना रामदास
४. मा.पालांडे सुजाता सुनिल
५. मा.पाटील सुजित वसंत
६. मा.चोंधे आरती सुरेश
७. मा.भालेकर अरुणा दिलीप
८. मा.बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.दंडवते – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील वाढीव क्षेत्राच्या हद्दीतील मौजे चिखली व तळवडे हद्दीवरील प्रस्तावित २४ मीटर रस्ता रुंदीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, कलम ३६ अन्वये फेरबदल करणेस मान्यता मिळणेबाबत – मा.अरुणा भालेकर, मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) प्रभाग क्र.६ मधील संजयगांधीनगर झोपडपट्टीमधील स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणेकरीता खोदलेल्या रस्त्याची तातडीने दुरुस्ती व डांबरीकरण करणेबाबत मा.वसंत लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **०२/०६/२०१६, १६/०६/२०१६ व ०७/०७/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १७ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ६८ विषय क्रमांक – ०१

दिनांक – २१/०७/२०१६ विभाग - नगररचना व विकास

सुचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१३/५४/२०१५, दि.११/०५/२०१५

विषय - पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी.हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व स.नं. १४ पै. मधील २४ व १२ मी. रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे भूसंपादनाबाबत...

**विषय क्रमांक १ चा विचार दिनांक ०२/०१/२०१७ चे सभेच्यावेळी करणेत यावा.**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ६९ विषय क्रमांक – ०२

दिनांक – २१/०७/२०१६

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.वसंत लोंढे

संदर्भ – मा.अरुणा भालेकर, मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील वाढीव क्षेत्राच्या हद्दीतील मौजे चिखली व तळवडे हद्दीवरील २४ मीटर रस्ता प्रस्तावित केलेला आहे. सदर रस्त्यावरील शिवरकर चौक ते बालाजी स्कूलपर्यंत मोठया प्रमाणात दोन्ही बाजूने बांधकामे झालेली आहेत व सदर मिळकतधारक हे अल्पउत्पन्नधारक कामगार वर्ग आहे. त्यामुळे प्रस्तावित ९.०० मीटर रुंदीचा रस्ता महापालिकेस विकसित करताना अडचणी निर्माण होतील तसेच बाधीत मिळकतधारक बेघर होतील. त्यामुळे चिखली व तळवडे हद्दीमधील जो २४ मी. रस्ता प्रस्तावित केलेल्या रस्त्यापैकी शिवरकर चौक ते बालाजी स्कूलपर्यंत अस्तित्वातील रस्त्यासह ९ मीटर रुंदीचा रस्ता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७० विषय क्रमांक – ०३

दिनांक – २१/०७/२०१६

सुचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर

संदर्भ – मा.वसंत लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.६ मधील संजय गांधीनगर झोपडपट्टीमधील स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणेकामी खोदलेल्या रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. सदर रस्त्यांची पावसाळयापूर्वी तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच सदर रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत स्थानिक

नगरसदस्यांनी मागणी केलेली आहे. वरील जागेवरील परिस्थिती पाहता मोशी संजय गांधीनगर झोपडपट्टीमधील रस्त्यांची पावसाळयापूर्वी तातडीने दुरुस्ती होऊन डांबरीकरण करणे आवश्यक वाटते. सद्यस्थितीमध्ये नुकतेच नविन आर्थिक वर्ष सुरु झाले असून नविन अंदाजपत्रकातील नविन कामाचे टेंडर प्रसिध्द होऊन प्रत्यक्ष काम सुरु होणेस विलंब होऊन पावसाळा सुरु होण्याची शक्यता आहे. सदर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पावसाळयापूर्वी होणे आवश्यक असून सदर रस्त्याचे काम करणेबाबत स्थानिक नगरसदस्य तगादा लावत आहे. त्यानुषंगाने सदर रस्त्याची दुरुस्ती व डांबरीकरण करणेकरीता र.रु.२५,००,०००/- चे अंदाजपत्रक (२०१४-१५ चे दरसुचीनुसार) तयार करणेत आले आहे. मा.सह शहर अभियंता यांचेशी झालेल्या चर्चेनुसार सदर कामाची तातडी पाहता सदर काम हे थेट पध्दतीने देणेस व सदर कामाचे र.रु.२५,००,०००/-( अक्षरी र.रु.पंचवीस लाख फक्त ) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच यापूर्वीचा मा.शहर सुधारणा समिती ठराव क्रमांक ४२, दि.१९/०१/२०१६ रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सौ.स्वाती प्रमोद साने )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३८६/२०१६
दिनांक : २१/०७/२०१६

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.